Ref. No.: जा. क्र. प्रेरणा बँक/मुख्य कार्यालय/सभासद कल्याण निधी/२०२१-२२/२३/५३५

Date : दिनांक : २२/०९/२०२१

प्रिय सभासद बंधू आणि भगिनी...

सप्रेम नमस्कार,

आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपली बँक पुढील २ वर्षात रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करेल. केवळ १५३० सभासद व रू. २८ लाख इतके भागभांडवलाच्या शिदोरीवर सुरू केलेला हा बँकींग व्यवसाय!!! आज पाहता पाहता एक वटवृक्ष झाला आहे ते केवळ आणि केवळ आपल्या खंबीर पाठिंबा व सहकार्याच्या बळावर!

प्रगतीकडे वाटचाल करित असताना केवळ व्यवसाय व नफा वाढ इतकाच सिमित दृष्टीकोन न ठेवता ज्यांनी बँकेस साथ दिली त्या सर्व सभासदांचे ऋणातून उतराई होण्यासाठी व अडचणीच्या संकटाच्या वेळी बँक सभासदांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे हा विश्वास निर्माण करण्यासाठी दि. २४/०१/२०१५ रोजी सुरू केलेल्या सभासद कल्याण निधी योजनेची व्याप्ती या वर्षी थोडीशी वाढवत आहोत.

सध्या चालू असणाऱ्या योजनांबरोबरच कोविड-१९ ने निधन पावलेल्या सभासदांचे कुटुंबियांना/वारसदारांना बँकेतर्फे अल्पशा मदत स्वरूपात रू. १०,०००/- चे अर्थ सहाय्य देण्याची घोषणा करीत आहोत. या योजनेचा संपुर्ण तपशिल सोबत उपलब्ध करण्यात आला आहे.

आपला नम्र,

PRERANA CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE LAXMANNAGAR, DANGE CHOWK, THERGAON, PUNE-33

श्री. कांतिलाल तुकारामभाऊ गुजर

चेअरमन

**संचालक मंडळ**

श्री. तुकारामभाऊ लक्ष्मणराव गुजर
संस्थापक - संचालक

चेअरमन - श्री.कांतीलाल तुकारामभाऊ गुजर

श्री. श्रीधर धोंडीराम वाल्हेकर | श्री. गबाजी भिवाजी वाकडकर | श्री. सुरेश नानाभाऊ पारखी | श्री. संजय संतुराम पठारे
श्री. संतोष वासुदेव मुंगसे | श्री. संदीप पोपट पवार | श्री. राजाराम नामदेव रंदिल | श्री. राजेंद्र महादेव शिरसाठ
श्री. उमेश तुळशीराम आगम | सौ. मिना अनिल शेळके | श्री.नंदकिशोर जमनलाल तोष्णीवाल-(तज्ञ संचालक)
ॲड.श्री.अजितकुमार दिनकर जाधव-(तज्ञ संचालक) | सौ. चंद्रभागा शिवाजी भिसे-(सल्लागार)
श्री. तानाजी सोनवणे-मुख्य कार्यकारी अधिकारी | श्री.लक्ष्मण बेहेरे-उप.मुख्यकार्यकारी अधिकारी | श्री. विजयकुमार शेळके-उप.मुख्यकार्यकारी अधिकारी

प्रेरणा को - ऑप. बँक लि.
PRERANA CO-OP. BANK LTD.
Head Office : Laxmannagar, Dange Chowk, Thergaon, Pune - 411 033. Phone : 9075028001 / 02

Ref. No.:

Date : २२/०८/२०२१

# सभासद कल्याण निधी योजना

❖ योजनेतील महत्त्वाचे मुद्दे :

या योजने अंतर्गत पात्र सभासदांना व त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकिय खर्चासाठी, अकस्मिक संकटासाठी योजनेच्या अटीनुसार आर्थिक सहाय्य केले जाते. तसेच विशेष प्राविण्यासाठी प्रोत्साहन रक्कम दिली जाईल.

१. अर्जदार अर्ज करण्याच्या तारखेपुर्वी किमान २ वर्षे सभासद असावा.
२. अर्जदाराचे मासिक उत्पन्न रू. २०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी असावे.
३. आर्थिक मदत पुढील प्रसंगात दिली जाईल.

अ) सामान्य आर्थिक मदत पुढील : योजनेमधील यादीतील निरनिराळ्या रोगांच्या उपचाराचा परतावा उपचारानुसार रू. २,५००/- ते रू. १५,०००/- पर्यंत

ब) अकसिमत आर्थिक मदत : अपघात, अकस्मित मृत्यु, तत्काळ वैद्यकिय सेवा वा अन्य कारणासाठी रू.३,०००/- पर्यंत तात्काळ मदत

क) कोविड-१९ मुळे दि. १ जानेवारी २०२० नंतर निधन झालेल्या सभासदांचे कुटुंबियांना/वारसदारांना विशेष मदत रू. १०,०००/-

ड) शिक्षणातील यश, विशेष शौर्य, राज्यस्तरावरील किंवा देशाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या खेळाडूस विशेष प्रोत्साहन पुरस्कार (उत्पन्नाची अट नाही.)

याशिवाय सभासदांसाठी एखादा सामूहिक उपक्रम जसे वैद्यकिय तपासणी शिबीर रक्तदान शिबीर वैगरे भरविली जातील.

योजनेचा संपुर्ण तपशिल व अर्जाचा नमुना बँकेच्या सर्व शाखा व मुख्य कार्यालयात उपलब्ध केला आहे तसेच संपुर्ण योजना व फॉर्म या www.preranabank.com वेबसाईटवर उपलब्ध करणेत आला आहे.

वरील संदर्भातील कोणत्याही माहितीसाठी ग्राहक सेवा केंद्र ☎ ७७२१९००९०० वर संपर्क करावा.

श्री. कांतीलाल तुकारामभाऊ गुजर
चेअरमन - प्रेरणा को-ऑप बँक लि.

PRERANA CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE LAXMANNAGAR, DANGE CHOWK, THERGAON, PUNE-33.

# *सभासद कल्याण निधी योजना*

## * सुधारीत *

सभासद कल्याण निधी योजना दि. ०६/०९/२०१४ चे संचालक मंडळाच्या सभेत मांडण्यात आली असून दि. ०७/०९/२०१४ चे वार्षिक सर्व साधारण सभेत या योजनेस मंजूरी देण्यात आलेली आहे. सदरची योजना दि. ०७/०९/२०१५ पासून अंमलात आलेली आहे. परंतु काळानुरूप सदर योजने मध्ये अमुलाग्र बदल करावे लागत आहेत. यामध्ये प्रामुख्याने कोवीड -१९ या संसर्गजन्य साथीचे आजाराचे परिणाम स्वरूप बँकेच्या सभासदांपैकी बऱ्याच सभासदांचे निधन कोविड-१९ या आजाराने झालेले आहे. यासभासदांचे कायदेशीर वारसांना/नॉमिनी यांना बँकेकडून आर्थिक मदत देणे करीता सभासद कल्याण निधी योजनेचा दि.३०/०७/२०२१ चे संचालक मंडळ सभेमध्ये आढावा घेवून सभासद कल्याण निधी मध्ये सुधारणा करणेत आली आहे.

➢ सभासद कल्याण निधी योजना नियम व मार्गदर्शी सूचना :

* सामान्य नियम :

१. सभासद कल्याण निधीचा विनियोग फक्त सभासदांचे कल्याणाच्या कारणांसाठीच केला जाईल.

२. बँक सभासद कल्याण निधीच्या गुंतवणुकी वरील व्याज आपल्या उत्पन्नला घेईल. मात्र आर्थिक मदत उपलब्ध निधीला नावे टाकून देणेत येईल.

३. या योजने अंतर्गत वैयक्तीक सभासद किंवा त्यांच्या कुटुंबियास आर्थिक मदत मिळू शकेल. सभासदास आर्थिक मदत मिळणेसाठी वयाची कोणतीही अट राहणार नाही.

४. सभासद कुटुंबिय या संज्ञेत सभासदाची पत्नी, पती, १८ वर्षाच्या आतील अविवाहीत मुलगा/मुलगी व ६० वर्षा पेक्षा अधिक वर्षांचे आई/वडील या कुटुंब सदस्याचा समावेश असेल.

५. अर्जदार, अर्ज करण्याचे तारखेपुर्वी सलग दोन वर्षे नियमित सभासद (क्रियाशील/अक्रियाशील) असणे आवश्यक आहे. ही व्यक्ती थकबाकीदार असता कामा नये. एका कुटुंबातील एकाच सभसादास किंवा एका लाभार्थीस एका आर्थिक वर्षात, एका कारणासाठी एकदाच आर्थिक मदत मिळू शकेल.

६. ज्या सभासदाचे मासिक उत्पन्न रू. २०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी आहे त्यालाच अकस्मिक आर्थिक मदत किंवा सामान्य आर्थिक मदत दिली जाईल.

७. आर्थिक मदतीचा अर्ज सभासदाने संबंधित शाखे मार्फत पाठविणे व या अर्जावर संबंधित शाखा समितीची शिफारस आवश्यक राहिल.

८. सामान्य स्वरूपाची मदत शाखेत अर्ज मिळाल्यापासून लगेचच्या संचालक मंडळाचे सभेत मंजूर/नामंजूर करून मा. संचालक मंडळाचा निर्णय सभासदास लेखी स्वरूपात कळविला जाईल व मदत मंजूर झाली असल्यास मदतीची रक्कम पे-ऑर्डर/NEFT ने दिली **जाईल.**

९. असस्मिक स्वरूपाच्या मदतीचा निर्णय त्वरीत कळविला जाईल. शक्यतो कोणतीही आर्थिक मदत पे-ऑर्डर व्दारा अदा केली जाईल. सभासदाने त्या रक्कमेची पावती देणे आवश्यक राहिल.

१०. या निधीतून कर्ज स्वरूपात कोणतीही मदत देता येणार नाही सभासदाने तशा प्रकारची मागणी करू नये त्यासाठी बँकेच्या स्वतंत्र कर्ज योजना सभसादांसाठी उपलब्ध आहेत.

११. एका आर्थिक वर्षात (१ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत) सभासद कल्याण निधीतून सर्व सभासदांना मिळून अधिकतम एकूण रू.दहा लाख पर्यंतची मदत केली जाईल.

१२. मदत देताना 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्वाने अर्जाची व मदतीची मंजूरी केली जाईल.

१३. एका आर्थिक वर्षात रू. दहा लाखांची मर्यादा संपल्यास त्यानंतर मदत मागणाऱ्या सभासदांना पुढील वर्षात प्रथम आलेल्यास प्राधान्य या तत्वानेच मदत देण्यात येईल.

१४. अत्यंत अपवादात्मक स्थितीत अटी शिथिल करणे आणि किंवा आर्थिक मदतीची रक्कम वाढविणचे अधिकार मा.संचालक मंडळास राहतील.



PRERANA CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE LAXMANNAGAR, DANGE CHOWK, THERGAON, PUNE-33.

१५. पुढील सर्व प्रकारच्या मदती दि. २४/०१/२०१५ पासून पुढील तारखेस उपचारा करीता केलेल्या खर्चा सबंधी मिळतील.

*** सभासद निधीची आर्थिक मदत पुढील चार विभागात दिली जाईल :**

१. सभासद कल्याणाच्या सामुहिक योजना
२. आकस्मिक आर्थिक मदत : ह्या संबंधी मंजूरीचे अधिकार मा. चेअरमन अथवा व्हाईस चेअरमन यांना राहतील.
३. सामान्य आर्थिक मदत : ह्या संबधी मंजूरीचे अधिकार मा. संचालक मंडळाला राहतील.
४. विद्यार्थी प्राविण्य व विशेष प्रोत्साहन पुरस्कार

*** सभासद कल्याणाच्या सामूहिक योजना :**

१. बँक व्यवस्थापन गरजू सभासदांसाठी व त्यांच्या कुटुंबियासाठी वैद्यकिय चाचणीचा कार्यक्रम राबवू शकेल. त्यासाठी येणारा खर्च या निधीतून करता येईल.
२. बँकेच्या सर्व महिला सभासदांसाठी तसेच जेष्ठ पुरूष सभासदांसाठी (वय वर्षे ६०) विनामूल्य वैद्यकिय तपासणी करावयाची सुविधा बँकेतर्फे उपलब्ध करून दिली जाईल.
३. बँक व्यवस्थापन गरजेनुसार बँकेच्या सर्व सभासदांसाठी एखादी कमी खर्चाची ग्रुप विमा पॉलिसी घेण्याबाबत विचार करू शकेल. विमा हप्त्याची रक्कम ह्या निधीला नावे टाकून अदा केली जाईल.
४. बँक व्यवस्थापन आर्थिक दृष्टया कमकुवत सभासदांसाठी किंवा त्यांच्या कुटुंबियासाठी मर्यादित स्वरूपात डोळे तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, चष्मे, श्रवण यंत्रे देणे,नेत्रहिन व्यक्तींना काठ्या देणे या सारखे उपक्रम सामूहिक स्वरूपात राबवू शकेल त्यासाठी येणारा खर्च या निधीतून केला जाऊ शकेल.
५. बँक व्यवस्थापन सभासद किंवा कुटुंबिय यांच्यापैकी जे पायाने अपंग/विकलांग आहेत त्यांना ''जयपूर फुट''/ व्हील चेअर या सारखी उपकरणे देण्याबाबत विचार करू शकेल.
६. बँक व्यवस्थापन सभासदाचे रक्तदान शिबीर कार्यक्रम आयोजित करू शकेल व गरजू व गरीब सभासदांना तातडीचे वेळी विनामूल्य रक्त उपलब्ध करून देण्याची योजना राबवू शकेल यासाठी येणारा खर्च या निधीतून करता येईल.
७. बँक व्यवस्थापन सभासद व कुटुंबियांसाठी पोलिओ,हेपाटायटिस, कोविड-१९ किंवा अन्य लसीकरणाचा कार्यक्रम हाती घेऊ शकेल, यासाठी या निधीतून खर्च करता येईल.

*** आकस्मिक आर्थिक मदत योजना :**

१. अपघात, आकस्मिक मृत्यु, तत्काळ वैद्यकिय सेवा, अंत्यविधी, दंगलग्रस्तता, चोरी, भूकंप, यापैकी एखाद्या कारणांमुळे एखाद्या गरजू व गरीब सभासदाला तत्काळ आर्थिक मदतीची गरज असेल तर तो सरळ मा.अध्यक्ष यांच्याकडे आपला लेखी अर्ज देऊ शकेल.
२. मा. अध्यक्ष प्राप्त परिस्थती लक्षात घेऊन एका सभासदाला अधिकतम रू. ३०००/- (अक्षरी रूपये तीन हजार मात्र) पर्यंत आर्थिक मदत मंजूर करून त्वरीत रक्कम अदा करू शकतील.

PRERANA CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE LAXMANNAGAR, DANGE CHOWK, THERGAON, PUNE-33

*** सामान्य आर्थिक मदत योजना :**

१. खालील रोगांच्या औषधोपचारा साठी अधिकतम मदत पुढील प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) अपघाताने किंवा नैसर्गिकरित्या अपंगत्व आल्यास रू. ७,५००/- मदत देता येईल. त्यासाठी किमान ४०% अपंगत्व आल्याचा बँकेस मान्य डॉक्टरांचा दाखला देणे आवश्यक राहिल. | २) डोळयांचे ऑपरेशन (काचबिंदू/पडदा/मोतीबिंदू वगैरे) रू. ३,०००/- | ३) ॲन्जीओप्लास्टी रू. १०,०००/- |
| ४) ॲन्जीओग्राफी रू. ३,०००/- | ५) मेजर ब्रेन सर्जरी रू. १५,०००/- | ६) किडनी ट्रान्सप्लान्ट रू. १५,०००/- |
| ७) कॅन्सरचे रोग निदान झाल्यास औषधेपचारासाठी एक वेळरू. ७,५००/- | ८)हार्निया/हायड्रोसलि/अपेंडिक्स/प्रोटेस्ट ग्लॅड इ. चे ऑपरेशन रू. २,५००/- | ९) युरिनरी स्टोन/गॉलब्लेंडर स्टोन इ. चे ऑपरेशन रू. २,५००/- |
| १०) मणक्याचे ऑपरेशन रू. ७,०००/- | ११) मेजर सर्जरी : (ॲबडॉमिनल, पॅनक्रियाज, गॉल, ब्लॅडर, युरेट, दोन्ही आतडी, प्लीहा, ओव्हरीज, फुफ्फुस, यकृत, **Anastomosis**इ. चे ऑपरेशन) रू. १०,०००/- | १२) सांधे रोपण (**Joint Replacement**) रू. १०,०००/- |
| १३) हॉर्ट व्हॉल्व्ह ऑपरेशन रू. १०,०००/- | १४) लिव्हर ट्रान्सप्लांट रू. १५,०००/- | |
| * अन्य कोणताही गंभीर आजार किंवा खर्चिक शस्त्रक्रिये साठी रू. १०,०००/- | | |

२. उपरोक्त निकषांपैकी काही वैद्यकिय कारणे पुन्हा पुन्हा होण्याची शक्यता असते (Recurring type) तरी उपरोक्त सर्व निकषांसाठी एक सभासद किंवा लाभार्थी एकदाच मदत मिळणे यासाठी पात्र राहिल.

३. पात्र सभासदाने ऑपरेशन झाल्याच्या तारखे पासून तीन महिन्याचे आत अर्ज करावयाचा आहे अर्जासोबत डॉक्टरांचे प्रमाणपत्र जोडावे.
वरील रोगांव्यतिरीक्त अन्य रोगांसाठी मदत देण्याचा व मदतीची रक्कम ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील पण ती रक्कम रू. १०,०००/- पेक्षा अधिक नसेल.

*** विद्यार्थी प्राविण्य पुरस्कार व विशेष प्रोत्साहन पुरस्कार :**

१. यासाठी इयत्ता १० वी किंवा १२ वी परिक्षेत कोणत्याही शाखेमध्ये ७०% पेक्षा जास्त गुण व प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या सभासदास किंवा त्याच्या पाल्यास रोख रू. ५००/- (रू. पाचशे मात्र) गौरव चिन्ह व रू.२००/- पर्यंत चे एखादे पुस्तक असा विद्यार्थी गौरव पुरस्कार दिला जाईल. विद्यार्थी प्राविण्य पुरस्कार शक्यतो परिक्षेच्या निकाला नंतर च्या वार्षिक सर्व साधारण सभेत दिले जातील.
त्याचप्रमाणे एखाद्या सभासदाच्या पाल्याने विशेष शाखेतील अभ्यासक्रम पूर्ण केला असेल तर त्यालासुध्दा विद्यार्थी गौरव पुरस्कार दिले जातील.

२. विशेष शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्याने या गौरव पुरस्कारासाठी चालू शैक्षणिक वर्षात परिक्षा दिलेली असणे आवश्यक आहे. स्वतः अर्जदार किंवा आई किंवा वडील बँकेचे सभासद असणे आवश्यक आहे.

३. या पुरस्कारासाठी कोणतीही सभासद किंवा त्याचा पाल्य राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त खेळाडू म्हणून खेळल्यास त्याला रोख रू. २,५००/- व आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधीत्वकेल्यास त्याला रोख रू. ५,०००/- चा गौरव पुरस्कार देण्यात येईल.

४. यासाठी कोणत्याही सभासद किंवा त्याच्या पाल्याने अलौकिक कामगिरी उदा. अंटार्टिक एक्सपीडिशन, कोणताहि विश्व विक्रम, शौर्या संबंधातील कोणतीही कामगिरी केल्यास त्याला रू. ५,०००/- चा गौरव पुरस्कार देण्यात येईल. अलौकीक कामगिरी ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास राहिल. बँकेच्या सभासदांना वरील प्रमाणे सभासद कल्याण योजनांचा फायदा मिळण्यासाठी सर्व सभासदांनी सतर्क राहून बँकेच्या मुख्य कार्यालयात प्रत्यक्ष भेटून लेखी वा पत्राव्दारे माहिती द्यावी जेणे करून अधिकाधिक सभासद या योजनेचा लाभ घेऊ शकतील.



PRERANA CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE LAXMANNAGAR, DANGE CHOWK, THERGAON PUNE-33

## * कोविड–१९ अर्थ सहाय्य योजना :

कोविड–१९ या संसर्गजन्य साथीचे आजाराची सुरूवात जानेवारी २०२० पासुन झाली असून त्याचा फटका सर्वच नागरिकांना बसला आहे. उदयोग धंदे बंद पडल्याने विकासाचे आर्थिक चक्रमंदावलेले आहे. तसेच या साथीचे आजाराने जगात असंख्य नागरिकांचे निधन झाले आहे. यामध्ये बँकेच्या काही सभासदांचेही निधन कोविड–१९ ने झालेले आहे.

बँकेच्या सभासदांचे निधन कोविड–१९ या संसर्गजन्य आजाराने झाले असल्यास त्यांच्या कायदेशीर वारसांना कुटंबाची आर्थिक गरज पुर्ण करणे करीता आर्थिक मदत म्हणून रक्कम रू.१०,०००/– सभासद कल्याण निधीतून मा.संचालक मंडळ देण्याचे ठरविणेत आले आहे.

सभासद कल्याण निधीतील नविन सुधारणे नुसार दि. ०१/०१/२०२० नंतर सभासदांचे निधन कोविड–१९ या संसर्गजन्य आजाराने झाले असल्यास त्याच्या जवळच्या कायदेशीर वारसांना ही मदत दिली जाईल. कोविड–१९ मदत निधी देण्याची कार्यपध्दती पुढील प्रमाणे राहील.

१) मृत्यु झालेल्या दिवशी मयत व्यक्ती प्रेरणा को–ऑप.बँकेचा नियमित सभासद असणे आवश्यक आहे.

२) मयत सभासदांच्या जवळच्या नातेवाईकाने/वारसदाराने बँकेकडे सभासद कल्याण निधीमधून मदत मिळविण्यासाठी एक वर्षाच्या कालावधीमध्ये अर्ज करणे आवश्यक राहिल. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

३) ही योजना वैयक्तिक सभासदांसाठी आणि प्रोप्रायटरी संस्थांचे बाबतीत प्रोप्रायटरासाठी लागू राहिल.

४) संपुर्ण कागदपत्रासह अर्ज मिळाल्यानंतरच्या लगेचच्या संचालक मंडळ सभेत मंजूरी घेवून वारसदारांस रक्कम अदा केली जाईल.

५) त्याचबरोबर मृत्यु झालेल्या सभासदांचे शेअर्स व अन्य ठेवींचा परतावा त्याच बरोबरीने पुर्ण केला जाईल.

६) मयत सभासदांचे कोणत्याही प्रकारचे कर्ज येणेबाकी/थकबाकी असल्यास सभासद कल्याण निधीतून मिळणारी रक्कम कर्ज खाती जमा करून घेतली जाईल.

७) मृत्यु पावलेल्या सभासदांच्या शेअर्सचा नॉमिनी/कायदेशीर वारसदार हा शेअर्सची रक्कम मिळविण्यासाठी पात्र राहिल. मात्र सभासद कल्याण निधीतून मदत मिळविण्यासाठी पुढील क्रमाने नातेवाईक पात्र राहतील.

अ) पती किंवा पत्नी

ब) मुलगी किंवा मुलगा

क) आई किंवा वडील

ड) बहीण किंवा भाऊ

* * *

PRERANA CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE LAXMANNAGAR, DANGE CHOWK, THERGAON, PUNE-33

# सभासद कल्याण निधीतून मदत मिळणे करीता विनंती अर्ज

दिनांक : / / २०

प्रति,
**मा. अध्यक्ष**
**प्रेरणा को-ऑप बँक लि.**
मुख्य कार्यालय
लक्ष्मणनगर, डांगे चौक, थेरगांव, पुणे - ३३.

मयत व्यक्तीचा फोटो येथे चिकटवावा

**विषय : सभासद कल्याण निधीतून मदत मिळणे बाबत...**

महोदय,

मी या अर्जाव्दारे आपणांस कळवितो की, आपल्या बँकेचे सभासद श्री/सौ/श्रीमती ________________ ________________ यांचे दि. / / २० रोजी ________________ या ठिकाणी कोविड-१९ या आजाराने निधन झाले आहे. संबंधित शासकीय/हॉस्पीटल प्रमाणपत्राची सत्यापित प्रत सोबत जोडली आहे. वरील मयत सभासद यांचे आपल्या बँकेत पुढील तपशीला प्रमाणे शेअर्स होते.

| अ.क्र. | खात्याचा प्रकार | सभासद क्रमांक | खाते उघडल्याचा दिनांक | शेअर्स रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

वरील खात्यासाठी नॉमिनी म्हणून माझे नाव आपल्या रेकॉर्ड वर नोंदविलेले होते/आहे.

☞ नॉमिनीचे सभासदाशी असलेले नाते : ________________ नॉमिनीचे वय : ________

☐ नॉमिनी म्हणून मी या अर्जाव्दारे आपल्याकडे माझ्या कुटुंबाची आर्थिक गरज पुर्ण करणे करीता सभासद कल्याण निधीतून अर्थ सहाय्य मिळणे करीता मी हा विनंती अर्ज करीत आहे.

☐ कायदेशीर वारस या नात्याने मी आपणाकडे सभासद निधीतून अर्थ सहाय्य मिळणे करीता विनंती करीत आहे.

☐ मयत व्यक्तीचे (सभासदाचे) आपणाकडे कर्ज खाते असल्याने सदर रक्कम कर्ज खात्यास जमा करावी.

* वरील पर्याया पैकी आपणास लागू असणाऱ्या पर्याया समोर ✓ अशी खूण करावी.

कृपया माझा हा विनंती अर्ज यथाशक्य लवकर प्रोसेस करून मला आर्थिक मदत मंजूर करावी ही विनंती.
कळावे.

**सोबत आवश्यक कागदपत्र**

| मयत व्यक्तीचे कर्ज खाते क्र. : | शाखा : |
|---|---|

**नॉमिनी/कायदेशीर वारसदाराचे ओळखीसाठी संदर्भ :**

नॉमिनी/कायदेशीर वारसाचे नाव : ________________

बँकेचे नाव : ________________

बँक खाते क्र. : ________________ शाखा : ________________

* सोबत बँक खाते तपशील जोडावा.

नॉमिनी/कायदेशीर वारसदाराचा फोटो येथे चिकटवावा

आपला विश्वासू

(सही - )

मयत सभासदाचे व नॉमिनी/कायदेशीर वारसाचे आधारकार्ड/पॅनकार्ड झेरॉक्स तसेच नॉमिनी/कायदेशीर वारसदारास ओळखणाऱ्या दोन प्रतिष्ठीत व्यक्तींची नावे, पत्ता व फोन क्रमांक :

| | |
|---|---|
| १) नाव : | सही : |
| २) नाव : | सही : |